आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 16/10/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 220 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# चेक तंत्रज्ञानाची निर्मिती महाराष्ट्रात व्हावी–मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई: भारतासह जागतिक बाजारपेठेसाठी चेक कंपन्यांनी अधिकाधिक चेक तंत्रज्ञानाची उत्पादन निर्मिती महाराष्ट्रात करावी. चेक कंपन्या आणि संस्थांनी ठोस प्रस्ताव सादर केल्यास राज्य शासन त्यांना अत्यंत वेगाने सहकार्य करेल. महाराष्ट्र-चेक प्रजासत्ताक उद्योग व गुंतवणूक भागीदारीचा नवा अध्याय सुरू करण्यासाठी महाराष्ट्र सर्व सहकार्य करेल असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



वर्षा निवासस्थानी चेक प्रजासत्ताकचे उपपंतप्रधान व व्यापारमंत्री कॅरोल हॅवलॉक व शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महाराष्ट्रात उद्योग क्षेत्रातील संधी आणि गुंतवणूक याबाबत चर्चा केली. यावेळी चेक प्रजासत्ताकच्या उद्योग व व्यापार मंत्रालय संचालक (युरोपेतर देश) रिचर्ड ह्लाव्हाती, उप-परराष्ट्र मंत्री मेरी शतारदोव्हा, परराष्ट्र मंत्रालय, महासंचालक शमारेक लिब्रिचिकी, महावाणिज्य दूत (मुंबई), कातेरिना वोव्हकोव्हा, चेक दूतावास प्रभारी राजदूत कातेरिना पीटरसेन, नवी दिल्ली, चेक खाण तंत्रज्ञान क्षेत्राचे प्रतिनिधी डॅनियल वासेक, 'एनेलेक्स'चे मुख्य कार्यकारी अधिकारी, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगन, सचिव डॉ. राजेश गवांदे, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र ही भारतातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असून परकीय गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र आहे. सन 2030 पर्यंत एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. केवळ अर्थव्यवस्थेचा आकार वाढविण्याऐवजी प्रगत उत्पादन, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाचे जागतिक केंद्र बनण्याची महाराष्ट्राची महत्वाकांक्षा असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.मुंबईत 1920 मध्ये तत्कालीन चेकोस्लोव्हाकियाने वाणिज्य दूतावास सुरू केला. त्यामुळे शतकाहून अधिक काळ मुंबई हे भारत-चेक प्रजासत्ताक संबंधांचे एक प्रमुख प्रवेशद्वार राहिले आहे. या ऐतिहासिक संबंधांना आता वैयक्तिक गुंतवणुकीपलीकडे नेत अधिक संरचित भागीदारीत रूपांतरित करण्याची आवश्यकता मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

प्रगत उत्पादन आणि वाहन क्षेत्रातील सहकार्याला मोठा वाव आहे. स्कोडा कंपनी भारतात 25 वर्षांपासून कार्यरत असून पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथे तिचे उत्पादन प्रकल्प आहेत. या भागीदारीचा पुढील टप्पा म्हणून इलेक्ट्रिक वाहने, अचूक अभियांत्रिकी, यंत्रसामग्री, स्वयंचलन आणि वाहन उद्योगाशी संबंधित टियर-वन व टियर-टू चेक पुरवठादारांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# पदवीधर,शिक्षक मतदारसंघात महायुतीचा विजय निश्चित-आ.शंकर जगताप

## पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिंचवडमध्ये संघटनात्मक नियोजन बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची एकजूट, परस्पर समन्वय आणि नियोजनबद्ध प्रयत्नांच्या बळावर पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास चिंचवड मतदार संघाचे आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला. निवडणुकीच्या तयारीसाठी चिंचवड येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते गुरुवारी (दि. 15) बोलत होते.**




या बैठकीला भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल, सरचिटणीस मधुकर बच्चे, मोरेश्वर शेंडगे, चिंचवड मतदारसंघातील मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, ॲड. हर्षद नढे, सोमनाथ तापकीर, सनी बारणे, मोहन राऊत, यांच्यासह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, मतदारसंघातील सर्व नगरसेवक, नगरसेविका, भाजपचे पदाधिकारी आणि मंडलाध्यक्ष उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत निवडणुकीची पूर्वतयारी, मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठीचे नियोजन आणि संघटनात्मक जबाबदाऱ्यांबाबत चर्चा करण्यात आली. पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजप उमेदवार डॉ. स्मिता योगेश जाधव आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार जगताप यांनी केले.

# पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर होणार आता कडक कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: अपुऱ्या पर्जन्यमानामुळे आणि आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता, नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि काटकसरीने करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.**



संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार पाणीपुरवठ्यात 10 टक्के कपात करण्याच्या अनुषंगाने महापालिकेने तातडीने उपाययोजना सुरू केल्या असून, पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी प्रभाग स्तरावर विशेष तपासणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, एल निनोच्या प्रभावामुळे यंदा तसेच पुढील वर्षी राज्यात पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. सध्या उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यातून दि. 31 ऑगस्ट 2027 पर्यंत पाणीपुरवठा करता यावा, यासाठी सर्व महानगरपालिका आणि इतर संबंधित संस्थांनी पाणीपुरवठ्यात 10 टक्के कपात करावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार पाण्याचे नियोजन आणि काटकसरीच्या वापरासाठी महापालिकेने कार्यवाही सुरु केली आहे.

### पिण्याच्या पाण्याचा वापर केवळ आवश्यक कामांसाठीच

गृहनिर्माण सोसायट्यांनी उद्याने, हिरवळी आणि झाडांना पिण्याच्या पाण्याऐवजी एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) तसेच जीटीपीच्या प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करावा. एसटीपी बंद ठेवणाऱ्या सोसायट्यांचे नळजोड कायमस्वरूपी बंद करण्यात येतील, असा इशाराही महापालिकेने दिला आहे.

शहरातील सर्व्हिस सेंटरमध्ये अनधिकृतरीत्या पिण्याच्या पाण्याचा नळजोड वापरला जात असल्यास तो तातडीने बंद करण्यात येईल.

तसेच संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. वाहनांची धुलाई, टेरेस आणि अंगण धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# गुणवत्ता संकल्पनावरील विभागीय वार्षिक अधिवेशन उत्साहात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**भोसरी : भोसरी येथील क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या , पुणे चॅप्टरच्या वतीने 41 वे गुणवत्ता संकल्पनावरील विभागीय वार्षिक अधिवेशन 2026 चे भोसरी येथील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले .**



यंदाच्या अधिवेशनात महाराष्ट्रातील 100 हून अधिक नामांकित औद्योगिक संस्थांनी सहभाग घेतला. दोन दिवस चाललेल्या या गुणवत्ता महोत्सवात एकूण 300 हून अधिक केस स्टडीज, 57 घोषवाक्य आणि 63 पोस्टर स्पर्धकांनी सादर करण्यात आले. विजेत्याना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण, रजत व कास्य पदक , प्रशस्तीपत्रक देवुन त्याना सन्मानपुर्वक गौरविण्यात आले . या स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी 38 परीक्षक लाभले होते, तर एकूण 1300 हून अधिक स्पर्धक, व्यवस्थापक आणि गुणवत्ता प्रेमींनी या अधिवेशनात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन दाना आनंद इंडिया प्रा. लि. चे बिझनेस युनिट हेड बालाजी माळी याच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे आयकॉन हॉस्पीटलचे संचालक, अध्यक्ष डॉ. प्रताप पोपट सोमवंशी , पिंपरी चिंचवड होमिओपथीक असोसिएशनचे माजी शहराध्यक्ष डॉ. संदीप लुणावत , क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे, पुणे चॅप्टरच्या माजी अध्यक्षा व संचालिका डॉ .रजनी इंदुलकर , फोरमचे पदाधिकारी प्रकाश यार्दी, धनंजय वाघोलीकर , अनंत क्षीरसागर , माधव बोरवणकर , परवीन तरफदार , खजीनदार संजीव शिंदे , व्यवस्थापक चंद्रशेखर रुमाले उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्वालिटी सर्कल चळवळीचे महत्त्व अधोरेखित करताना, उत्पादन क्षेत्रापासून सेवा क्षेत्रापर्यंत गुणवत्ता, उत्पादकता आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी क्वालिटी सर्कल हे एक प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले.

दोन दिवस चाललेल्या या अधिवेशनात विविध संस्थांतील कर्मचाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील समस्या, त्यावरील उपाययोजना आणि त्यातून मिळालेले फायदे यांचे प्रभावी सादरीकरण केले. गुणवत्ता व्यवस्थापन, खर्चात बचत, सुरक्षितता आणि कार्यपद्धतीत सुधारणा या विषयांवरील केस स्टडीज विशेष आकर्षण ठरल्या.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 16/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# नवरात्रोत्सवानिमित्त पिंपळे सौदागरमध्ये रक्तदान शिबिर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत पिंपळे सौदागर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. उन्नती सोशल फाउंडेशन, लायन्स क्लब ऑफ पिंपळे सौदागर आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चर, पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरात जवळपास 50 जणांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात योगदान दिले.**




कुंजीर चौकाजवळील उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात मंगळवारी (दि. 13) हे शिबिर पार पडले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांची उंची व वजन मोजण्यात आले.

तसेच त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले. आधार ब्लड सेंटरच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले.पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समिती सदस्या तथा पिंपळे सौदागर प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन झाले.

यावेळी उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, लायन्स क्लबचे अध्यक्ष संजय सोनार, झोनल चेअरपर्सन लॉ. बालाजी जगताप, पिंपरी-चिंचवड आर्किटेक्चर संघटनेचे अध्यक्ष ऋषीकेश देवरे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सचिव सखाराम ढाकणे, उपाध्यक्ष अनिल कुलकर्णी, पदाधिकारी दिलीप चौगुले, रमेश चांडगे तसेच आनंद हास्य क्लबचे बाळकृष्ण चौधरी आदी उपस्थित होते.

रक्तदान हे श्रेष्ठ सामाजिक कार्य असून, अशा उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होते.

नवरात्रोत्सवाच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे आणि यशवंत देव यांना मानवंदना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे – मराठी भावसंगीताचे विश्व आपल्या अजरामर संगीतरचनांनी समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे आणि संगीतकार, गीतकार यशवंत देव यांना, त्यांच्याच संगीतरचनांचे अर्घ्य अर्पण करणारी जन्मशताब्दी 'स्वरवंदना' ही आगळीवेगळी मैफल बुधवारी रसिकांना स्मरणरम्य काळात नेणारी ठरली.**




32 व्या पुणे नवरात्रौ महोत्सवाच्या चौथ्या माळेची सायंकाळ मराठी भावसंगीतातील दिग्गज संगीतकार श्रीनिवास खळे आणि यशवंत देव यांच्या गाजलेल्या गीतांमुळे श्रवणीय ठरली. नेहरू स्टेडियम येथील गणेश कला क्रीडा मंदिरात झालेल्या या कार्यक्रमात बालगीते, भावगीते, भक्तीगीतांपासून लावणीपर्यंतचे वैविध्य रसिकांनी अनुभवले.

कला, संस्कृती आणि संगीताचा संगम साधणाऱ्या पुणे नवरात्रौ महोत्सवात आयोजक अध्यक्ष आबा बागुल यांच्या पुढाकाराने 'जन्मशताब्दी स्वरवंदना' हा कार्यक्रम रत्ना दहिवेलकर यांनी प्रस्तुत केला. या कार्यक्रमाची संकल्पना, संहिता, निर्मिती, निवेदन आणि बालगीताचे गायन अशा अनेक भूमिका रत्ना दहिवेलकर यांनी पार पाडल्या.जय जय महाराष्ट्र माझा, या श्रीनिवास खळे यांनी संगीतबद्ध केलेल्या राजा बढे यांच्या गीताने खळे यांना कृतज्ञ स्वरांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरवात झाली. त्यानंतर आदीशक्तीच्या उत्सवाचे औचित्य साधून माझी रेणुकामाऊली हे भक्तीगीत सादर झाले. पाठोपाठ तुझे गीत गाण्यासाठी, जीवनात ही घडी, लाजून हासणे, त्याची धून झंकारली, या जन्मावर या जगण्यावर, विसरशील खास मला, पहिलीच भेट झाली. स्वर आले दुरुनी, दिवस तुझे हे फुलायचे, शुक्रतारा मंदवारा, जेव्हा तुझ्या बटांना, कळीदार कपूरी पान, आनंदाचे डोही आनंद तरंग....अशा अजरामर संगीतरचनांचा आस्वाद रसिकांनी घेतला आणि जणु सांगीतिक अमृतयोग अनुभवला.

खळे आणि देव यांनी संगीतबद्ध केलेल्या बालगीतांचा मेडले रसिकांची दाद मिळवणारा ठरला. तसेच त्यांनी संगीतबद्ध केलेल्या भक्तीरचनांची मालिकाही रसिकांना भक्तीरसपूर्ण वातावरणात घेऊन गेली. खळे यांच्या रचना सुरांनी शब्दांना खुलवणाऱ्या तर देव यांच्या रचना शब्द, त्यातील आशय यांना जपत स्वरांचे कोंदण घेऊन येणाऱ्या होत्या. मराठी भावसंगीताचे आणि मराठी मनांचे संवेदनशील विश्व स्वरश्रीमंत करणारी ही मानवंदना ठरली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 16/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पुणे पदवीधर व शिक्षक निवडणुकीत विजयासाठी भाजपाची मोर्चेबांधणी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : आगामी पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, प्रभारी आणि कार्यकर्त्यांची एकत्रित नियोजन बैठक आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडली. निवडणुकीची पूर्वतयारी, प्रचार यंत्रणेचे नियोजन आणि मतदारांशी प्रभावी संपर्क साधण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**



पुणे पदवीधर मतदारसंघाच्या भाजपा-महायुतीच्या उमेदवार डॉ. स्मितादेवी योगेश जाधव आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार श्री. कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारासाठी संघटनात्मक यंत्रणा अधिक सक्रिय करण्यावर भर देण्यात आला. मतदार संपर्क, बूथनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप आणि पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधील समन्वय अधिक मजबूत करण्याबाबत आमदार लांडगे यांनी मार्गदर्शन केले.पदवीधर आणि शिक्षक मतदारांच्या अपेक्षा, स्थानिक प्रश्न व अडचणी समजून घेण्यासाठी त्यांच्याशी सातत्यपूर्ण संवाद साधणे आवश्यक असल्याचे लांडगे यांनी सांगितले. मतदारांपर्यंत पोहोचताना त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे. प्रत्येक स्तरावरील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापली जबाबदारी ओळखून नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रचारातील सातत्य आणि परस्पर समन्वयाच्या माध्यमातून मतदार संपर्काला गती देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. दोन्ही उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत मिळवून देण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली पुण्यासह राज्यातील पाचही जागांवर विजय मिळवण्याचा संकल्प पक्षाने केला आहे, असेआमदार लांडगे यांनी यावेळी स्पष्ट केले. पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 8 ते दुपारी 4 वाजेपर्यंत मतदान होणार आहे. दोन्ही मतदारसंघांतील नोंदणीकृत मतदारांनी आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

# धर्मांतर करणाऱ्यांना आरक्षणाचे लाभ मिळणार नाही!

## आमदार अमित गोरखे यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे उठवला होता धर्मांतराचा प्रश्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महाराष्ट्रामध्ये धर्मांतर बंदी कायदा लागू झाल्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने देखील एक अत्यंत महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय दिला आहे. धर्मांतर केल्यानंतर जुन्या जाती-धर्मांच्या आधारे मागासवर्ग आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, असा स्पष्ट निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे खऱ्या मागासवर्गीय आणि अनुसूचित जातीतील (SC) नागरिकांच्या हक्कांचे रक्षण होणार असून, फसवणूक करून लाभ घेणाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे, अशी प्रतिक्रिया आमदार अमित गोरखे यांनी दिली.**



पावसाळी अधिवेशनादरम्यान महाराष्ट्रातील बळजबरी, फसवणूक आणि विविध आमिषे दाखवून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराचा गंभीर विषय आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात लक्षवेधी सूचनेद्वारे अत्यंत आक्रमकपणे मांडला होता. काही 'क्रिस्तो ख्रिश्चन' - ज्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे, परंतु ते कागदोपत्री अजूनही अनुसूचित जातीचे (SC) प्रमाणपत्र वापरून सवलती व आरक्षणाचा लाभ घेत आहेत, ही बाब आमदार गोरखे यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली होती. यामुळे खऱ्या अर्थाने गरजू आणि पात्र असलेल्या अनुसूचित जातीतील नागरिकांवर मोठा अन्याय होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले होते.

आमदार अमित गोरखे यांच्या या लक्षवेधी सूचनेची गांभीर्याने दखल घेत, माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सभागृहात धर्मांतराविरोधात कठोर कायदा करण्याचे आश्वासन दिले होते. ते आश्वासन प्रत्यक्षात उतरवत महाराष्ट्र सरकारने राज्यात 'धर्मांतर बंदी कायदा' लागू केला आहे.

धर्मांतर बंदी कायद्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा सामाजिक न्यायाची पुनर्रचना करणारा आहे. धर्मांतर करून मूळ धर्माचे लाभ लाटणाऱ्या प्रवृत्तीला आता पूर्णपणे नियंत्रण जाईल.

दिलेला शब्द कृतीत उतरवून समाजातील वंचित घटकांचे रक्षण केल्याबद्दल मी राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो, असे आमदार अमित गोरखे यांनी प्रतिपादन केले आहे.